Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

# मराठ्यांचा आद्य इतिहासकारः कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ (१७८९-१८५८)

**प्रा. डॉ. गावंडे के. एस.**
इतिहास विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावनाः**

मराठी राज्याच्या उगमापासून पेशवाईच्या अंतापर्यंतचा सलग इतिहास लिहिण्याचे काम ग्रँट डफ या इंग्रज पोलिटिकल रेसिडेंटने केले. ग्रँट डफचा जन्म स्कॉटलंडमधील बॉन्फ या गावी दि. ८ जुलै १७८९ रोजी न्किरडिन ओनिलच्या मध्यमवर्गीय कुंटुबात झाला. त्याचे वडील जॉन ग्रँट १७९९ साली तो दहा वर्षाचा असतांना वारले, आई मार्गारेट मिटन ही डफ घराण्यातील होती. तिचा भाऊ व ग्रँट डफचा मामा विल्यम डफ १८२४ मध्ये वारला यामूळे डफ घराण्याचे नाव व जमीनजुमला या मायलेकरांना मिळाला. तेव्हापासून अजोळीचे डफ हे नावही त्याच्या पितृक नावापुढे लागले. [१]

**जीवनचरित्रः**

ग्रँट डफ वयाच्या सोळाव्या वर्षी लष्करात भरती झाला व इ.स. १८०६ साली मुंबईला आला. येथेच त्याने लष्करी शिक्षण घेतले. गेनेडिअर्स अथवा बॉम्बे नेटिव्ह इनफंट्री या सैन्य तुकडीचा तो अधिकारी बनला. काठेवाड येथील लूटारुंच्या मालिया या बालेकिल्ल्यावर हल्ला करण्याची व त्यांचा बंदोबस्त करण्याची कामगिरी त्याने यशस्वी केली. इ.स. १८१० साली तो लेफ्टनंट झाला. त्याने फार्सी भाषा आत्महसात केली. तो फलटणींचा फार्सी दुभाषा म्हणून निवडला गेला. यावेळी माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन पुण्यातील पेशवांचा पोलीटिकल रेसिडंट कर्नल क्लोज याचा मदतनीस होता. त्याचे या तरुण व चूणचूणीत लष्करी अधिका-यावर लक्ष गेले. अल्पावधीतच एल्फिस्टन पूणचा रेसिडंट झाला. त्याने ग्रँट डफला पूण्याला बोलावून घेतले व त्याची वर्णी पॉटिंजर ब्रिग्ज आणि चॅपलिनसारख्या निकटवर्तियांमध्ये लावली. कारण एल्फिस्टनला एका कुशल मुत्सदी सैनिकाची आवश्यकता होती ती त्याने डफच्या समावेशने पूर्ण केली. दोघातील स्नेह मैत्री वाढतच गेली. सन १८९७ साली झालेल्या खडकी युध्द्‌ात मोठा पराक्रम गाजविला. पुढे काही महिन्यातच पेशवाईचा अस्त झाला. एल्फिस्टनला मुंबईचे गव्हर्नरपद देण्यात आले. ग्रँटला कॅप्टनपद देण्यात आले. कंपनी सरकारने साता-याचे राज्य स्वतंत्र ठेवण्याचा निर्णय घेतला. त्याचा पोलिटिकल रेसिडंट व कर्तबगार अधिकारी म्हणून एल्फिस्टन समोर एकच नाव होते ग्रँट डफ ! अशा रितीने २००० मासिक वेतन व १५०० मासिक भत्ता त्याला मंजूर होऊन तो कंपनीचा विश्वासू अधिकारी बनला. तो साता-याा १८१८ ते १८२२ असा चार वर्ष वास्व्यास होता. प्रतापसिंहाबददल ममता व सहानुभूती डफला होती. त्याने अनेक सुधारणा सातारा राज्यात घडवून आणल्या. यामुळे तो लोकप्रिय झाला. [२]

**मराठा इतिहासलेखनः**

छत्रपतींच्या दप्तरखान्यातील अनेक कागदपत्रांचा त्याने अभ्यास केला. वखरी, करीने, कुलकटे, महजरे व तवारिखां याचे तज्ञ मंडळीकडून वाचन करुन घेतले. त्याला मराठीचे ज्ञान चांगले होते. पेशवाईच्या उत्तरार्धातील लिहिल्या गेलेल्या अनेक बखरी त्याला मिळाल्या.

इ.स. १६४९ ते १७२५ या दरम्यानच्या मराठी सत्तेच्या उत्कर्षाच्या कालखंडातील अनेक अस्सल फार्शी मराठी कागदपत्रे ग्रँटला मिळाली. यात प्रामुख्याने चिटणीसांनी लिहिलेला मराठयांचा इतिहास होता, शहाजहानची १६४९ ची फर्माने, औरंगजेबाची काही पत्रे, सय्यद हुसेन अलीखान याचा अमीर उल उमरावांशी झालेला पत्रव्यवहार तहनामे, सनदा, मुहम्मदशाहीची १७१९ ते १७२५ दरम्यानची पत्रे अशी महत्वपूर्ण साधने त्याच्या वाचनात आली. [३]

तर ग्रँट डफने सभासद बखर चिटणासांची, बखर, मो-यांची बखर, टॉमस कोटसकृत भाषांतरीत बखर, बॅरी क्लोज याने अनुवादीत केलेली बखर, कोल्हार च्या कुलकर्णी यांच्या कडील बखर आणि खटाव येथील देशपांडयांनी लिहिलेला मराठयांचा इतिहास असे ग्रंथ प्रत्यक्ष पाहिले.[४]

त्याने महाराष्ट्र व महाराष्ट्रबाहेरील अनेक संस्थानिकांना जुन्या कागदपत्रांसाठी विनंती केली की मराठी, फार्सी, संस्कृत भाषेतील कैफियती, बखरी, ताम्रपटे, वतनपत्रे, इनामपत्रे, हकिकती व सनदा काही दिवसांसाठी अभ्यास करण्यास द्यावीत.[५] सातारच्या दप्तरखान्यात छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यंकोजीस लिहिलेले पत्र, औरंगजेबाची पत्रे, चिमाजी अप्पा व ब्रम्हेंद्रस्वामी यांच्यातील पत्रव्यवहार, काही तवारिखा, बखरी, खाफीखानाच्या मुन्तखाब-उल-लुबाबची एक प्रत आणि असंख्य कागदपत्रे त्याला मिळाली. त्याने या सर्व साधनांचा एक इतिहास पट, टाचणे व टिपणे काढून पूर्ण केला व येथेच मराठयांचा इतिहासच्या प्रेमात पडला.[६] मराठयांचा इतिहास लिहावा हा मनातील विचार त्याने थोडे दचकतच १९ जुलै १८९९ रोजी एल्फिन्स्टनला सांगितला. दोघांमध्ये गुरु-शिष्य असे संबंध एव्हाना तयार झाले होते होते. एल्फिस्टनने त्याच्या कल्पनेचे स्वागतच केले नाही तर त्याला प्रोत्साहन दिले, सहायय केले व सुचनाही कली. वास्तविक मराठयांच्या इतिहास लिहिण्याचा विषय एल्फिन्स्टनच्या मनातच घोळत होता.[७] परंतु कामाचा व्याप, जबाबदारी यामुळे त्याला ते शक्य झाले नाही परंतु आपली कल्पना डफने स्विकारली. म्हणून तो खंबीरपणे डफच्या मागे उभा राहिला आहे. त्याचप्रमाणे बाळाजीपंत नातूचेही मोडी लिपी संदर्भात डफला मोलाचे सहकार्य मिळाले. इ.स. १८२२ साली त्याने मराठयांच्या इतिहासाची एक प्रत तयार केली व ती एल्फिस्टन जॉन ब्रिग्झ, हेन्स केनेडी, विल्यम एर्स्किन आणि बाळाजीपंत नातू यांना दाखविली.[८] २६ नोव्हेंबर १६२२ रोजी त्याने सातारा सोडले, मुंबईला आला व १६ जानेवारी १८२३ साली त्याने भारत सोडला तो पुन्हा कधीही भारतात आला नाही.

इंग्लडमध्ये अनेकांचे मार्गदर्शन घेऊन २ लाख शब्दांचे नकाशे चित्रे असे परिपूर्ण हस्तलिखित जॉन मरे आणि कंपनीकडे प्रसिध्दीसाठी दिले. मराठयांचा इतिहास या शिर्षकाऐवजी मुघलांचे पतन आणि ब्रिटीशांचा विजय असे कराल तर छापले जाईल अशी अट टाकली. त्याने हस्तलिखित परत घेतले. लॉगमन कंपनीद्वारे स्वत:चे दोन हजार पौंड रक्कम खर्च करुन मराठयांचा इतिहास हा इंग्रजीत ग्रंथ सन १८२७ साली प्रसिध्द् केला. ग्रंथ विक्रीतून केवळ ३०० पौंड वसूल झाले. त्याने फार मोठा आर्थिक तोटा सहन करत मराठयांचा इतिहास लिहून पूर्ण केला. त्याच्या मृत्यूनंतर १९७० पर्यंत सात आवृत्त्या निघाल्या. याची मराठी आवृत्ती डेव्हिड केपन व बाबासाने यांनी मराठयांची बखर म्हणून प्रसिध्द् केली.[९]

ग्रॅंट डफ हा मुळचा शिपाई गडी लेखन हा त्याचा प्रांत नव्हता परंतु त्याच्या ठाई जिज्ञासूबुध्दी, चिकाटी ठासून भरलेली असली तरी त्याला आपल्या मर्यादांची जाणीव होती. इतिहासलेखनासाठी लागणारा वेळ प्रशासकीय जबाबदारी सांभाळून काढणे जिकरीचे होते हेही त्याला ज्ञान होते. घटनांचे केवळ निवेदन करण्याचा स्वत:च उदद्‌श त्याने ग्रंथाच्या प्रस्तावनेतच केला आहे. माझ्या चूका दाखवून दिल्यास मी ऋणी राहील असेही लिहिले आहे.[१०]

ग्रँट डफच्या ग्रंथावर सर्वप्रथम डेक्कन कॉलेजमधील एक हुशार विद्यार्थी निळकंठराव जनार्दन किर्तने यांनी टिका केली. इ.स. १८६८ साली पूना यंग मेन असोशियशन समोर ५४ पानांची एक टिकात्मक समीक्षा किर्तने यांनी सादर केली. मराठयांच्या इतिहासाचे निरुपण कसे असावे या संबंधी आपला दृष्टीकोन प्रामुख्याने मांडला आहे.[११] ग्रँड डफचा ग्रंथ अपूरा व अधुरा आहे.[१२] या ग्रंथात मराठयांच्या विविध युध्द् मोहिमांचा इतिहास आहे. त्याचप्रमाणे सनावळया, तारखा या अनेक ठिकाणी चुकीच्या दिल्या असून अस्सल कागदपत्रांचा फार कमी वापर केला आहे. बखरींच्या आधारे लिखाण केले आहे अशी टिका किर्तने यांनी केली.[१३]

इ.स. १८९८ साली इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनीही विस्तृत स्वरुपाची टिका केली आहे. राजवाडे यांच्या मते डफची मराठयांचा इतिहास लिहिण्याची योग्यता नव्हती कारण समाधान कारक माहितीचा अभाव, उपलब्ध कागदपत्रांचा योग्य वापर न करणे, तारखा न देणे यामुळे ज्या पध्द्‌तीने ग्रंथ तयार व्हायवयास हवा होता तसा झाला नाही. अनेक त्रुटया राहून गेल्या आहेत.[१४] राजवाडे पुढे लिहितात की, दुय्यम दर्जाच्या बखरी,

तवारीखा वापरुन मराठंयाची इंग्रजीत पुन्हा एक बखरच लिहिली आहे. मराठयांचा सुरुवातीचा कालखंड १५० वर्षाचा त्याने ४७५ पृष्टे लिहिला तर इ.स. १७४६-१७९६ या काळात पुण्यात इंग्रजी वकील दरबारी असतांना, या काळाचे कागदपत्रे उपलब्ध असतांना केवळ २०० पानांमध्ये आटोपशीर इतिहास दिला आहे.[१५] इ.स. १७५० ते १७६१ या काळातील सुसंगत लिखाण केले नाही, मोहिमा गाळल्या आहेत. राघोबा दादा पेशवा यांच्या मोहिमाबदद्ल तो काहीच लिहिला नाही. १७५६ च्या सावनूर कित्तूर या मोहिमाबदद्लही त्यांची लेखणी शांत दिसले असेही राजवाडेंनी लिहिले आहे.[१६]

वासुदेवशास्त्री खरे यांनी सुध्द्‌ा टिका केली. ग्रँट डफने सनावळया, नावे, संदर्भ या चुका कोठे कोठे झाल्या आहेत याची यादी भारत इतिहास संशोधक मंडळातील १९१५-१९१६ च्या सभामध्ये सादर केली पुढे त्या लोकमान्य टिळकांनी केसरीमध्ये प्रसिध्द् केल्या. डफच्या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर जवळपास १०० वर्षांनी हया चूका वासुदेव शास्त्रींनी निदर्शनास आणल्या होत्या.[१७]

न्या. महादेव गोविंद रानडे यांनीही डफवर टिका केली. त्यांच्या ग्रंथाला उत्तर देण्यासाठी मराठी सत्तेचा उत्कर्ष हा ग्रंथ लिहून डफचा वणवा सिध्द्‌ांत खोडून काढतांना अनेक पुरावेही दिले. तसेच मराठा इतिहासाचे सत्यस्वरुप लोकांसमोर मांडणे त्यांचे ध्येय होते.[१८]

काशिनाथ नारायण साने यांनी काव्येतिहास संग्रह या १८७८ साली सुरु केलेल्या मासिकात डफवर टिका केली. हे मासिक जिनसीवाले, चिपळूणकर, किर्तने, साने, मोडक इ. मंडळीचा सहभाग होता.[१९]

वरील टिकात्मक लिखाणावरुन ग्रँट डफने मराठयांचा इतिहास लिहून फार मोठा गुन्हा केला. अशातला भाग नाही. वासुदेव शास्त्री लिहितात की त्यांच्या ज्ञान लालसेचे कौतुक करावे कारण कोण मराठे, त्याला काय देणे होते, कशाला व्याप वाढवावा, दप्तरे पालथी घालावी असा विचार त्याने केला नाही. उलट पदरचे पैसे टाकून हा इतिहास प्रसिध्द् केला.

द.वा. पोतदारे यांच्या शब्दात ग्रँट डफने आपल्या परीने चांगली मेहनत केली आणि जरी त्याचा इतिहास आधुनिक मनाला पटण्यासारखा नसला तरी प्रतिपक्षातील एका सैनिकी पेशातील व्यक्तीने पहिला प्रयत्न केला. [२०]

न.र. फाटक डफच्या लिखाणाबदद्ल मत व्यक्त करतात की,

Even though, it will not be underserve to praise that if we say the Grant Duff has taught the people of Maharashtra the lesson of writing history. He is the first man who prepared the entire outline of the history of the Maratha rule by Co-ordiating places, periods, men and events as far it was possible for him and that it was useful for further research in history.[२१]

ज्या मराठयांकडून आपण भारत जिंकला त्या मराठयांचा कर्तबगारीचा इतिहास जगाला सांगावा, हीच त्याच्या इतिहासलेखनामागील प्रमुख प्रेरणा होती.[२२]

इ.स. १८९८ साली भारतवर्ष या मासिकाच्या उददे्शाविषयी संपादक रावबहादूर द.व. पारसनिस ग्रँट डफच्या चरित्रांचे महत्व विशद करतांना किर्तने यांनी जी टिका केली त्यावर उत्तर देतात की, किर्तने यांच्या टिकेमुळे ग्रँट डफसाहेबा संबंधी लोकांमध्ये एक गैरसमज झाला आहे. तसा व्हावा अशी कृती ग्रँट डफसाहेबांनी केली नव्हती. उलट त्यांनी महाराष्ट्रावर उनंत उपकार केले. महाराष्ट्रातील जनतेवर त्यांचे किती प्रेम होते हे इंग्लडहून साता-याला प्रतापसिंहाना त्यांनी जो पत्रव्यवहार केला त्यावरुन दिसून येते. पुढे त्यांनी १९०५ साली मराठी ऐतिहासिक वाड्.मय या शिर्षकाखाली मुंबई शाखेच्या रॉयल ऐशियाटिक सोसायटीत एक शोधनिबंध वाचला. त्यात त्यांनी ऐकाणीसाव्या शतकातील पहिल्या अर्धशतकातील एक महत्वाचा ग्रंथ असा गौरवपूर्ण उल्लेख ग्रँटच्या ग्रंथाबदद्ल केला.[२३]

इ.स. १८६८ साली कीर्तने यांनी टिका केली असली तरी त्यांनी डफचे ऋण मान्य केले ते म्हणतात या ग्रंथातील काही व्यंगे आम्ही दाखविली म्हणून त्या ग्रंथाविषयी पूज्यबुध्द्‌ी कोणापेक्षाही आमची कमी आहे असे समजू नये कारण या विषयावर प्रथम त्यांनीच ग्रंथ लिहिला आहे.[२४]

जदुनाथ सरकारांनी शिवाजी अँण्ड हिज टाईम्स चा आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत फक्त हे काम ग्रँट डफच्या इतिहासापेक्षा मूळ साधन सामग्रीवर कसे आधारीत आहे हे सोदाहरण दाखविले.[२५] डफचा हा ग्रंथ लिहिण्यामागील

मूळ हेतू इंग्रजी वाचकाला विशेषत: ब्रिटिशांना मराठयांचा पराक्रम दाखविणे आणि त्यांची माहिती करुन देणे हा होता. त्याच्या मनात मराठयाबदद्ल आकस नव्हता कारण तो एका ठिकाणी लिहितो की, ब्रिग्ज हा इतिहासकार मुघल किंवा पठाण आहे आणि मी एक गरीब मराठा माणुस आहे. [२६]

ग्रँट डफनंतर मराठयांच्या इतिहासावर अनेकांनी लिखाण केले. सी.ए. किंकेड, रा.ब.द.ब. पारसनीस या त्रयींनी तब्बल एका शतकानंतर मराठयांचा इतिहास लिहिला तर रियासतकारांनी आपल्या रियासतींचे इंग्रजीत भाषांतर केले. तर छत्रपती शिवाजी बदद्ल सर जदुनाथ सरकार, डॉ. बाळकृष्ण केळुसर आणि वैद्य यांनी लिखाण करतांना डफपेक्षा काहीच वेगळे लिहिले नाही. [२७]

थोडक्यात त्याचे मूल्यमापन करतांना वरील विश्लेषणातून सर्वांनी त्याच्या लिखाणाचे मोठेपण मान्य केले असे दिसते.

ग्रँट डफ ईडनला शेतक-यांचे जीवन जगु लागला. २३ सप्टेंबर १८५८ रोजी त्याचा ईडन (स्कॉटलंड) येथे मृत्यू झाला. त्याचा ग्रंथ त्याच्या हयातीत दुर्लक्षीत राहिला. त्याच्या मृत्यूनंतर पाच वर्षांनी टाईम्स ऑफ इंडियाने दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. सन १९२१ पर्यंत पाच आवृत्त्या निघाल्या. पाचवी आवृत्ती ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने १९२१ काढली. त्यात डफचे संक्षिप्त चरित्र दिले आहे.

**संदर्भ:**

१. जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश, खंड-२, पृ. ५१६
२. डॉ. कुलकर्णी अ. रा., जेम्स कॅनिंगहम ग्रँट डफ, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७१, पृ. ११
३. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. ३७.
४. कित्ता, पृ. ४२.
5. Kulkarni A. R., Grant Duff, Historians and Histro-graphy in modern India, Editor- Sen S.P. Institute of Historical Studies, 1973, Calcutta-17, Page 402.
६. डॉ. कुलकर्णी अ. रा. मराठयांचे इतिहासकार आणि संशोधक, मराठयांचा इतिहास, खंड-३, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६ पृ. ५१६.
७. डॉ. कुलकर्णी अ. रा., जेम्स कॅनिंगहम ग्रँट डफ, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७१, पृ. ५१६.
८. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. ३९.
९. डॉ. कुलकर्णी अ. रा., जेम्स कॅनिंगहम ग्रँट डफ, पुणे विद्यापीठ प्रकाशन, १९७१, पृ. २०३.
१०. कित्ता, पृ. २०८, २०९.
११. कित्ता, पृ. २०८, २०९.
१२. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. ४५.
१३. कित्ता, पृ. ४५.
१४. राजवाडे वि. का., राजवाडे लेखसंग्रह भाग-१, ऐतिहासिक प्रस्तावना, वर्धा बुक्स, पुणे १९९१, पृ. २६
१५. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. ४५.
१६. राजदरेकर सुहास, इतिहासलेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९४८, पृ. १२७.
१७. कित्ता, पृ. १२६.
१८. डॉ. कुलकर्णी अ. रा. मराठयांचे इतिहासकार आणि संशोधक, मराठयांचा इतिहास, खंड-३, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६ पृ. ५२७.
१९. बेंद्र वा. सी. संपादन, निबंधसंग्रह क्र. ३, पृ. १७.

२०. राजदरेकर सुहास, इतिहासलेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९४८, पृ. १२७, १२८.
२१. फाटक एन. आर.-हिस्टोग्राफी इन महाराष्ट्रा, संपा. 'डिसूझा ॲण्ड कंपनी, कुलकर्णी सी. एम., पृ. १४९.
२२. डॉ. कुलकर्णी अ. रा. मराठयांचे इतिहासकार आणि संशोधक, मराठयांचा इतिहास, खंड-३, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६ पृ. ५२३.
२३. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. ४४.
२४. कित्ता, पृ. ४५.
२५. कित्ता, पृ. ४५.
२६. कित्ता, पृ. ४६.
२७. कित्ता, पृ. ४७.